महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा)
महाराष्ट्र शासनाची संस्था

**Maharashtra Energy Development Agency (MEDA)**
A Government of Maharashtra Institute

सत्यमेव जयते

MEDA महाऊर्जा

REN/SPV/2018-19/CR-98/Solar/**93** 11th January, 2022

To
M/s. Hasmukh Jain And Co
52, Nath Madhv Path, Amarwadi,
Khattergali, 2nd Floor, C.P.Tank, Mumbai.

**Subject: - Debarment and Blacklisting of M/s. Hasmukh Jain And Co for Work order for Design, Manufacture, Supply, Installation, Testing and Commissioning with Five Years Comprehensive Maintenance Contract Of Off-Grid SPV Power Plants At Various Districts in the State Of Maharashtra.**

Reference: - REN/SPV/2018-19/CR-98/Solar/2870A dtd. 31st August, 2019.

This is to inform you that your firm has not completed the work under the reference work order for Design, Manufacture, Supply, Installation, Testing and Commissioning with Five Years Comprehensive Maintenance Contract Of Off- Grid SPV Power Plants At Various Districts in the State Of Maharashtra.

Accordingly, you have not installed the system even after giving you repeated instructions through letters and VC meetings to install the system and submit the reports. So, it is very unfortunate that you are not willing to do this. This has resulted in time and financial loss to the beneficiary organization and MEDA.

As per the tender and work order terms & conditions, due to incomplete work, your firm has been disqualified from this tender and is hereby debarred and blacklisted for five years, with immediate effect, from participation in any project/tenders of MEDA.

Yours faithfully,

General Manager (Solar)

CC :-

1) Joint Secretary, ----- For Information.
Ministry of New and Renewable Energy (MNRE),
Block No. 14, C.G.O. Complex,
Lodi Road, New Delhi - 110 003.

2) All State Nodal Agency / DISCOM's / State Government Departments -------- ----- For Information.

# महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा)
महाराष्ट्र शासनाची संस्था

**Maharashtra Energy Development Agency (MEDA)**
A Government of Maharashtra Institute

सत्यमेव जयते

MEDA महाऊर्जा


आरईएन/एसपीव्ही/२०१८-१९/सीआर-९८ई/सौर/ ९३ दि. ११ जानेवारी, २०२२

प्रति
मे. हसमुख जैन अँण्ड कंपनी,
५२, नाथ माधवपथ, अमरवाडी, खतरेगल्ली,
२ रा मजला, सी.पी.टँक, मुंबई.

**विषय :- वित्त वर्ष २०१८-१९ मध्ये राज्यातील शासकीय / निमशासकीय कार्यालयांच्या इमारतींवर सौर विद्युत संच आस्थापित करण्यासाठी आपणांस निर्गमित केलेले कार्यादेश रद्द करुन आपल्या कंपनीचे नाव काळया यादीत समाविष्ट करण्याबाबत.**

संदर्भ :-
१) कार्यादेश क्र. आरईएन/एस.पी.व्ही/२०१८-१९/सी.आर-९८/सोलार/२८७०ए दि. ३१ ऑगस्ट, २०१९.
२) महाऊर्जाची कारणे दाखवा नोटीस क्र. आरईएन/कारणे दाखवा नोटीस/२०१९-२०/६९९ दि. १५ फेब्रुवारी २०२०.
३) महाऊर्जाची कारणे दाखवा नोटीस क्र. आरईएन/कारणे दाखवा नोटीस/२०१९-२०/८८६ दि. २८ फेब्रुवारी २०२०.
४) महाऊर्जाची कारणे दाखवा नोटीस क्र. आरईएन/कारणे दाखवा नोटीस/२०१९-२०/३६६८ दि. ८ डिसेंबर, २०२०.
५) महाऊर्जाची कारणे दाखवा नोटीस क्र. आरईएन/कारणे दाखवा नोटीस/२०१९-२०/१८६ दि. १५ जानेवारी, २०२१.
६) महाऊर्जाची कारणे दाखवा नोटीस क्र. आरईएन/कारणे दाखवा नोटीस/२०१९-२०/१४९४ दि. ८ एप्रिल, २०२१.
७) म. वि. का., नागपूर यांचे पत्र क्र. मेडा/वि.का.नागपूर/२०२१-२२/१२२३ दि. २५ नोव्हेंबर, २०२१.
८) म. वि. का., नागपूर यांच्याकडील दि. ६ डिसेंबर, २०२१ रोजीचा ई-मेल.
९) म. वि. का., नाशिक यांचे पत्र क्र. वि.का.ना./फा.नं.३३ ब/२०२१-२२/८८८ दि. १५ डिसेंबर, २०२१.
१०) म. वि. का., मुंबई यांचे पत्र क्र. वि.का/मेडा-मुंबई/पा.वि/२०२१-२२/१६५४ दि. १५ डिसेंबर, २०२१.
११) म. वि. का., पुणे यांचे पत्र क्र. वि.का.पुणे/सीआर-१६२-३/शा.निम.का./२०२१/७२६ दि. १५ डिसेंबर, २०२१.

वित्त वर्ष २०१८-१९ मध्ये राज्यातील ३९ शासकीय / निमशासकीय कार्यालयांच्या इमारतींवर ४५७ कि.वॅ. क्षमतेचे सौर विद्युत संच आस्थापित करण्यासाठी आपणांस एकूण रु.३,९६,०२,०००/- रकमेचे कार्यादेश देण्यात आले. कार्यादेशातील अटी व शर्तीनुसार आपणांस ७ ठिकाणी आस्थापित केलेल्या सौर विद्युत संचाचे ८० टक्के देयक रु.७०,१६,०००/- इतके अदा करण्यात आले.

महाऊर्जा विभागीय कार्यालयांमार्फत सदर योजनेसाठी वेळोवेळी घेण्यात आलेल्या आढावा बैठकींत मे. हसमुख जैन अँण्ड कंपनी, मुंबई यांच्या कामाचा सद्य:स्थिती अहवाल खालीलप्रमाणे सादर केला आहे :-

- महाऊर्जा विभागीय कार्यालय, नागपूर :- संदर्भ क्र. ७ व ८ अन्वये नागपूर विभागांतर्गत १८ ठिकाणांपैकी २ ठिकाणी संयंत्रे आस्थापित केली आहेत. उर्वरित १० ठिकाणी साहित्य पुरवठा करण्यात आला नाही, ४ ठिकाणी सोलर पॅनल पुरवठा करण्यात आला आहे आणि २ ठिकाणी स्ट्रक्चर पुरवठा करण्यात आले असल्याचे निदर्शनास येते.

- महाऊर्जा विभागीय कार्यालय, नाशिक :- संदर्भ क्र. ९ अन्वये नाशिक विभागांतर्गत ४ ठिकाणांपैकी २ ठिकाणी संयंत्रांची आस्थापना अर्धवटरित्या केली असून उर्वरित २ ठिकाणी साहित्य पुरवठा करण्यात आला नसल्याचे निदर्शनास येते.
- महाऊर्जा विभागीय कार्यालय, मुंबई :- संदर्भ क्र. १० अन्वये मुंबई विभागांतर्गत २ ठिकाणांपैकी १ ठिकाणी संयंत्राच्या साहित्याचा पुरवठा केला असून उर्वरित १ ठिकाणी साहित्य पुरवठा करण्यात आला नसून सदरच्या २ ठिकाणी अद्यापपर्यंत कामास सुरुवात झालेली नसल्याचे निदर्शनास येते.
- महाऊर्जा विभागीय कार्यालय, पुणे :- संदर्भ क्र. ११ अन्वये पुणे विभागांतर्गत ११ ठिकाणांपैकी ४ ठिकाणी प्रकल्पाचे काम पूर्ण झाले असून देयक मुख्यालयास सादर केले असल्याचे, ५ ठिकाणी प्रकल्पांची संयुक्त तपासणी पूर्ण झालेली आहे परंतु प्रकल्पाच्या देयकाच्या नस्ती मूळ कागदपत्रांसह वारंवार मागणी करुन देखील अद्याप सादर केलेल्या नसल्याचे, तसेच २ ठिकाणी प्रकल्पाची आस्थापना बऱ्याच काळापासून अपूर्ण ठेवली असून अद्याप कार्यरत होऊ शकले नसल्याचे निदर्शनास येते.

त्यानुसार प्रलंबित संयंत्रे आस्थापित करुन त्याचा अहवाल सादर करण्याबाबत आपणांस पत्रांद्वारे व VC बैठकीद्वारे वारंवार सुचना देऊन देखील आपणांकडून संयंत्रे आस्थापित करण्यात आलेली नाहीत. त्यामुळे आपण सदरची कामे करण्यास इच्छुक नसल्याचे निदर्शनास येत असून ही अत्यंत खेदजनक बाब आहे. यामुळे लाभार्थी संस्था व महाऊर्जा यांच्या वेळेचे व आर्थिक नुकसान झालेले आहे.

यावरुन असे दिसून येते की, आपण शासनाच्या अंगिकृत संस्थेची दिशाभूल करीत असल्याचे स्पष्ट होते. अशा प्रवृत्तीला अटकाव घालण्याकरिता यापुढे महाऊर्जामार्फत आपली कंपनी व प्रकल्पांना कोणतीही संमती न देता आपणाकडील प्रलंबित प्रकल्पांची कामे रद्द करण्यात येत आहे. आपल्याला कळविल्यानुसार सदरच्या प्रलंबित प्रकल्पांसाठी येणार खर्च या प्रकल्पातील महाऊर्जाकडे शिल्लक निधी व आपण जमा केलेली सुरक्षा ठेव यामधून करण्यात येणार आहे. त्याकरिता आपण जमा केलेली सुरक्षा ठेव जप्त करण्यात येत आहे.

शासनाची दिशाभूल व फसवणूक करणे या कारणाने आपल्या कंपनीचे नाव काळ्या यादीत टाकण्यात येत असून यामुळे होणाऱ्या नुकसानास संपूर्णपणे आपण जबाबदार आहात. तसेच आपल्या कंपनीस यापुढे महाऊर्जामार्फत प्रसिद्ध होणाऱ्या निविदांमध्ये सहभागी होता येणार नाही याची नोंद घ्यावी.

महाव्यवस्थापक (सौर)

प्रत :-

१) सह सचिव,
नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्रालय, भारत सरकार,
नवी दिल्ली. ----- यांना माहितीस्तव सादर.

| | | |
|---|---|---|
| २) All State Nodal Agency / DISCOM's / State Government Departments -------- | ----- | यांना देऊन कळविण्यात येते की आपणामार्फत प्रसिद्ध होणाऱ्या निविदांमध्ये मे. हसमुख जैन ॲण्ड कंपनी, मुंबई यांना सहभागी करुन घेण्यात येऊ नये. |
| ३) जिल्हाधिकारी,<br>सर्व जिल्हाधिकारी कार्यालये | ----- | यांना माहितीस्तव. |
| ४) आयुक्त / मुख्याधिकारी,<br>सर्व महानगरपालिका / नगर पंचायत / नगर परिषद | ----- | यांना माहितीस्तव. |
| ५) मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>सर्व जिल्हा परिषद, | ----- | यांना माहितीस्तव. |
| ६) प्रादेशिक संचालक / विभागीय महाव्यवस्थापक / व्यवस्थापक,<br>सर्व महाऊर्जा प्रादेशिक / विभागीय / जिल्हा कार्यालये, | ----- | यांना माहितीस्तव व योग्य कार्यवाहीस्तव. |

७) महाऊर्जा संकेतस्थळ